## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. १८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०३/२०१७

**१) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन वीट मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०३/२०१७ चे २३.३० वा. दरम्यान यातील आरोपी व फिर्यादी हे नागपुर पवनी रोडवर वेगवेगळया वाहनावर चालक म्हणुन काम करत असतांना त्यांचे तोंडातोंडी भांडण झाले होते त्याच कारणावरुन यातील फिर्यादी हा आपले मित्र जयवेत मेश्राम याला मोटार सायकलने घरी सोडण्याकरीता गेला असता यातील आरोपीने हातात वीट घेवुन फिर्यादीचे डोक्यावर, उजव्या पायावर डाव्या हातावर वीट मारली त्यामुळे डोक्यातुन रक्त निघुन जखमी झाला व डाव्या हाताला खरचटल्याची जखम झाल्याने फिर्यादी अमोल ईश्वर रामटेके वय ३१ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड पवनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन जुन्या वादावरुन काठीने मारुन जखमी केले . :–**

दिनांक १२/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी धनराज रामचंद्र ढोक वय ४० वर्ष, रा. कोटलपार हा आपल्या कुटुबांसह घरामध्ये असतांनी आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन जुन्या वादावरुन फिर्यादीस ओढत घराबाहेर काढुन काठीने डोक्यावर पायावर हातावर मारुन जखमी केले तेव्हा फिर्यादीची पत्नी आडवी झाली असतांना तीला सुध्दा वाईट शिवीगाळ करुन मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,४५२,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारेपो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन जुण्या वादावरुन भांडण करुन दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०३/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस जुने कोर्ट केस हरल्याचे वादावरुन भांडण करुन आरोपी क्र. १ ने हातात दगड धरुन फिर्यादीस डाव्या डोळयावर, डोक्यावर मारुन जखमी केल्याने व आरोपी क्र २ ने थापडबुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादी राजेश रामदास हेडाऊ वय ४० वर्ष, रा. राजगुरु वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलवर चार इसम बसवुन धोका निर्माण होईल अश्या स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०३/२०१७ चे १०.०० ते १०.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर चार इसम बसवुन आपले मागील बसलेल्या इतर लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत हयगयीने मोटार सायकल चालवीतांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०३/२०१७ चे ११.४० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी १८८८ चा चालकाने दारु पिऊन दारुचे नशेत चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनॉलाझर मशीन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व वैद्यकीय रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबडे पोस्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १३/०३/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाचे आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३७६१ च्या चालकाने दारु पिऊन दारुचे नशेत चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल अनालायझर मशिनव्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पोस्टे. कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. गोपाले पोस्टे कारधा हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती ५७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

PSI

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

पोलीस अधीक्षक कार्यालय
भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.